## निशाणी क्र. ०५ वरील आदेश

सदर प्रकरणात अर्जदारांनी प्रस्तूत अर्जाव्दारे आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे गैरअर्जदाराच्या विरूध्द तत्पुरता मनाई हुकूम मिळावा अशी विनंती केली आहे.

**अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे :**

०२. अर्जदारांनी वाद मिळकतीबाबत गैरअर्जदारांविरूध्द मनाई हुकूमाचा दावा दाखल केला व सदर अर्जाव्दारे अर्जदारांनी गैरअर्जदारांविरूध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळावा यासाठी अर्ज दाखल केला असून नमुद केले की, मौजे खडकी, ता. भोकरदन जि. जालना येथील गट क्रमांक ५ मध्ये अर्जदार व गैरअर्जदार यांनी सन २०११ मध्ये विहीर खोदली. सदर विहीरीसाठी संपूर्ण खर्च अर्जदारांनी केला असून गैरअर्जदार क्र. १ ची जमीन नदीकाठी असल्याने त्यास चार आणे हिस्सा दिला व अर्जदार यांचा बारा आणे हिस्सा ठरला. त्यावर अर्जदारांनी स्वत :चा विद्यूत पंप ईलेक्ट्रीक—मोटर बसवून स्वत:चे जमीनीस पाणी नेले. सदर विहीरीबाबत फेरफार क्र. ९९६ मंजूर झाला आहे. त्यानुसार गट क्र. ५ च्या ७/१२ उता—यात ईतर अधिकारात विहीरीबाबत अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ची एक विहीर समाईक कडूशा रोडाशा ५० पैसे, राजुशा कडूशा भंडारी २५ पैसे व यासीन २५ पैसे हिस्सा अशी नोंद आहे. अर्जदार क्र. १ चा सदर विहीरीशी बारा आणे हिस्सा असुन अर्जदार क्र. १ ने फेरफार क्र. ३११० अन्वये अर्जदार क्र. २ राजुशा याचे नावावर ४ आणे हिश्याचा फेर केलेला आहे. अर्जदार क्र. १ व २ हे सख्खे पिता व मुलगा असुन ते विहीरीचे बारा आणे हिश्याचे संयुक्त कब्जेदार आहेत.

०३. गैरअर्जदार क्र. १ याने गट क्र. ५ मधील जमीन त्याच्या मालकीची असल्याचा गैरफायदा घेवून त्याची कोणतीही स्वतंत्र विहीर नसतांना अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ याने सन २०११ साली खोदलेली विहीर त्याचीच एकटयाची आहे असे भासवुन तलाठयांशी संगनमत करून

प्रत्यक्षात विहीर नसतांना अर्जदार व गैरअर्जदार यांनी मिळून सामाईक खोदलेली विहीर त्याचीच आहे असे भासवून फेरफार क्र. ३१२२ करून घेतला व स्वत: विहीर खोदली असे नमुद केले. सदर विहीर सन २०१४ मध्ये बांधून पुर्ण झाली असुन त्यावर विद्युत पंप सुध्दा बसविलेला आहे व अर्जदार हे पाण्याचा उपभोग घेत आहे. गैरअर्जदारांनी अर्जदारांची ईलेक्ट्रीक मोटार विहीरीवरून काढुन घरी घेवून गेला. त्याबाबतची तक्रार अर्जदारांनी पोलीस ठाणे हसनाबाद येथे दिलेली आहे. साक्षदार व गावातील तंटामुक्त समिती, पंचायत समीती, विहीर खोदणारे कामगार, गावकरी मंडळी यांचे पोलीस ठाणे हसनाबाद यांनी घेतलेले जवाब तसेच गट क्र. ५ चा ७/१२ उतारा सोबत दाखल केलेले आहे.

०४. अर्जदारांनी गैरअर्जदारांना मोटार आडवु नका, मला पाणी वापरू द्या, माझा व माझे मुलांचा बारा आणे हिस्सा सदरविहीमध्ये आहे अशी ब—याच वेळेस विनंती केली परंतू गैरअर्जदारांनी ऐकले नाही. तसेच गावातील सर्व लोकांनी गैरअर्जदारांना समजावून सांगितले परंतू गैरअर्जदारांनी दिनांक ०५.०३.२०१९ रोजी अर्जदारांना पाण्याचा वापर करण्यास व उपभोग घेण्यास, विद्यूत पंप चालू करण्यास स्पष्ट इन्कार केला. अर्जदारांनी सदर फेरफार क्र. ३१२२ बाबत तहसिलदार यांच्याकडे देखील तक्रार केली व फेरफार रद्द बातल करण्याची विंनती केली परंतु गैरअर्जदारांनी जुमानले नाही. सर्व गैरअर्जदार आडदांड वृत्तीचे असुन अर्जदारांना विहीरीवर येण्यास मज्जाव करीत आहेत. करिता, अर्जदारास गैरअर्जदारांविरूध्द तात्पुरता मनाईहुकूमाचा आदेश पारीत करणे न्यायाचे आहे नसता अर्जदारांचे कधीही न भरून येणारे नुकसान होईल व अर्जदार आपल्या हक्कापासून वंचित होईल.

०५. गैरअर्जदारांचे निशाणी क्र. ११ प्रमाणे सदर अर्जावरील म्हणणे असे की, अर्जदार यांची गिरजा नदीकाठी कोणतीही विहीर नाही तसेच फेरफार क्र. ३१२२ रद्दबातल व खोटा तसेच बेकायदेशीर असल्याचे जाहीर करण्याचे अधिकार हे महसूल न्यायाधिकाराच्या क्षेत्रात येते. तसेच

गैरअर्जदार क्र. १ याची गट क्र. ५ मध्ये वडिलोपार्जीत शेतजमीन असून गैरअर्जदार क्र. १ याने दिनांक ११.०२.१९९८ रोजी नोंदणीकृत खरेदीखत क्र. ६०२/१९९८ व्दारे मौजे खडकी येथील गट क्र. ५ मधील नामे याशीनशहा अब्दूल्ला यांची २० आर पुर्वेस : सखाराम गोपाळा, पश्चिमेस : मुबारक शहा मकबूल शहा, दक्षिणेस : ईस्माईल शहा व उत्तरेस गिरजा नदी या चतु:सिमेच्या आतील शेतजमीन विकत घेतली. सदर शेतजमीनीत नदीकाठी एक जुनी पडकी विहीर होती. त्याचे खोदकाम करून गैरअर्जदार क्र. १ याने सदर विहीर पुन:जिवीत करून तिचा फेरफार क्र. ३१२२ मंजूर करून घेतला, सदर विहीर ही गैरअर्जदार क्र. ०१ च्या मालकीची व ताब्याची असल्यामूळे अर्जदारांचा विहीरीबाबत कोणताही संबंध नाही.

०६. दिनांक ११.०१.२०११ रोजी नोंदणी खेरदीखताआधारे गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ यास विहीर खोदण्याकामी २ आर जमीनीचे विक्रीपत्र करून दिले व सदर जमीनीत विहीर खोदल्यानंतर पाण्यात चार आणे हिस्सा हा गैरअर्जदार क्र. १ याचा राहील याप्रमाणे पुर्वेस : नाला, पश्चिमेस, दक्षिणेस व उत्तरेस : गैरअर्जदार क्र. १ याची जमीन अशी चतु :सिमा असलेली विहीर गैरअर्जदार क्र. १ व अर्जदार क्र. १ यांनी खोदली. परंतू अर्जदाराने विहीरीच्या चतु:सिमा न दर्शवता केवळ गट क्र. ५ मधील गैरअर्जदार क्र. १ च्या मालकीची स्वतंत्र विहीरीवर ताबा मिळविण्याकरीता दावा दाखल केला. तसेच अर्जदार क्र. १ याने गैरअर्जदार क्र. १ ची कोणतीही परवाणगी न घेता महसूल अधिका—यांशी संगणमत करून अर्जदार क्र. २ च्या नावे सामाईक विहीरीचा पाण्याबाबचा फेर क्र. ३११० मंजूर करून घेतला. कारण गैरअर्जदार क्र. १ सदर वाद विहीरीमध्ये चार आणे पाण्याचा सह मालक व सह हिस्सेदार आहे. अर्जदारांनी संबंधीत पोलीसांशी हातमिळवणी करून गैरअर्जदार क्र. १ विरूध्द ईलेक्ट्रीक मोटार विहीरीवरून काढणे बाबत व घरी घेवून जाणेबाबत खोटी तक्रार पोलीस ठाणे हसनाबाद येथे दिली. तसेच गैरअर्जदार क्र. १ हा सह हिस्सेदार व सहमालक असल्यामुळे त्यांच्या विरूध्द मनाई हुकूम मागता येत नाही.

करिता गैरअर्जदारांनी सदरील अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०७. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विधीज्ञांची कथने व सविस्तर युक्तीवादवरून खालील मुद्दे उपस्थीत होतात व त्यावरील निष्कर्ष हे मी त्यापुढे नमुद केलेल्या कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी दावा हा अर्जदाराच्या बाजुने असल्याचे अर्जदार सिध्द करतात काय ? | नाही |
| २. | न्यायाचा समतोल हा अर्जदारांच्या बाजूने आहे काय ? | नाही |
| ३. | मनाई हुकूमाचा आदेश त्यांच्या बाजूने न झाल्यास अर्जदाराचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | नाही |
| ४. | आदेश काय ? | अर्ज नामंजूर |

## कारणमिमांसा

०८. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या वकिलांचे लेखी म्हणणे व सविस्तर युक्तीवाद ऐकला.

### मुद्दा क्र. १ ते ३ करीताः

०९. वरील मुद्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता ते एकत्रीत चर्चीले जात आहे.

१०. कायद्याची स्थापीत स्थिती अशी आहे की, तात्पुरता मनाई हुकूमाकरीता प्रथमदर्शनी दावा व न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असून मनाई हुकूम न मिळाल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे, या तिन्ही बाबी अर्जदाराने सिध्द करणे गरजेचे आहे.

११. प्रस्तूतचा दावा अर्जदारांनी वादातील विहीरीच्या त्यांच्या हिश्यास गैरअर्जदारांनी हरकत अडथळा करू नये म्हणून त्यांच्याविरूध्द कायम मनाई हुकूम मिळण्यासाठी तसेच वादातील गैरअर्जदारांचा महसूल

फेरफार अर्जदारांवर बंधनकारक नसल्याचे जाहीर होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे. तसेच प्रस्तूत अर्जाअन्वये अर्जदारांनी वादातील विहीरीच्या त्यांच्या हिश्यास गैरअर्जदारांनी हरकत अडथळा करू नये म्हणून दाव्याच्या अंतीम न्यायनिर्णयापावेतो त्यांच्या विरूध्द तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याची मागणी केली आहे. प्रस्तूत प्रकरणातील तथ्य परिस्थीती अशी आहे की, अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे शेतजमीन गट क्र. ५ मधील गिरजा नदीच्या उत्तर बाजूच्या काठावर अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांनी सन २०११ मध्ये विहीर खोदली होती. सदरील विहीरीचा संपुर्ण खर्च अर्जदार क्र. १ ने केला परंतू गैरअर्जदार क्र. १ यांची शेतजमीन नदीकाठी असल्यामूळे सदरील विहीरीत अर्जदार क्र. १ याने गैरअर्जदार क्र. १ यास चार आणे हिस्सा दिलेला आहे. तसेच सदरील विहीरीबाबत महसूल फेरफार क्र. ९९६ मंजूर झालेला आहे व सदरील फेरफार आज रोजी अस्तीत्वात आहे.

१२. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, सदरील विहीरीतील उपभोगास गैरअर्जदार यांनी अर्जदार यांना हरकत अडथळा करून स्पष्टपणे नकार दिलेला आहे. तसेच सदरील शेतजमीनीत गैरअर्जदार क्र. १ यांनी कुठलीही नविन विहीर खोदलेली नसून सदरील अर्जदारांच्या विहीरीस नविन विहीर दाखवून त्याबाबत गैरअर्जदार क्र. १ याने बेकायदेशीर फेरफार क्र. ३१२२ नोंदवून घेतलेला आहे. परंतू त्याठिकाणी गैरअर्जदार क्र. १ यांची कुठलीही नविन विहीर नाही.

१३. याउलट गैरअर्जदार यांचे असे कथन आहे की, सदरील शेत गट क्र. ५ मध्ये त्यांची वडिलोपार्जीत शेतजमीन होती व त्यानंतर सन १९९८ मध्ये त्यांनी ईस्माईल शहा मकबूल शहा यांच्या कडून २० आर शेतजमीन विकत घेतलेली आहे. त्याप्रमाणे सदरील गटात गैरअर्जदार यांची ६५ आर शेतजमीन आहे. सदरील जमीनीपैकी गैरअर्जदार क्र. १ यांनी सन २०११ मध्ये गैरअर्जदार क्र. १ यास विहीर खोदण्यासाठी २ आर जमिन विक्री केलेली आहे व सदरील व्यवहारानुसार त्यामध्ये गैरअर्जदार क्र.

१ यांनी स्वत:चा चार आणे हिस्सा राखीव ठेवलेला आहे. त्याप्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार हे सदरील विहीरीचा उपभोग घेतात. परंतू गैरअर्जदार क्र. १ याने सदरील गटात वर नमूद केलेल्या २० आर शेतजमीनीत तेथे पुर्वीची एक जुनी विहीर होती व सदरील विहीर गैरअर्जदार क्र. १ याने पुन :जिवीत करून त्याबाबत महसूल फेरफार क्र. ३१२२ मंजूर केलेला आहे व सदरील फेरफार आज रोजी अस्तीत्वात आहे. गैरअर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांची व अर्जदार क्र. १ यांची सामाईक विहीर वेगळी आहे व गैरअर्जदार क्र. १ यांनी पुन:जिवीत केलेली विहीर या दोन्ही विहीरी वेगवेगळया आहेत. तरी देखील अर्जदार हे बेकायदेशीरपणे सामाईक विहीरीतील गैरअर्जदार क्र. १ चा हिस्सा टाळण्यासाठी व गैरअर्जदार क्र. १ च्या नविन विहीरीत बेकायदेशीर कब्जा करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामूळे अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ हे वादातील विहीरीचे सह मालक व सह हिस्सेदार असल्यामूळे सदरील अर्ज मंजूर करणे योग्य नाही.

१४. वर नमूद दोन्ही पक्षकारांचे परस्पर विरोधी कथन विचारात घेता अर्जदारांनी अभिलेखावर दाखल केलेल्या महसूल फेरफार क्र. ९९६ चे अवलोकन केले असता सदरील फेरफार वादातील सामाईक विहीरीबाबत आहे व त्यामध्ये अर्जदार क्र. १ च्या बारा आणे हिश्याचे व गैरअर्जदार क्र. १ यांच्या चार आणे हिश्याची नोंद आहे. तसेच अर्जदार क्र. १ यांनी सदरील वादातील विहीरीतील त्यांच्या बारा आणे हिश्यापैकी चार आणे हिस्सा अर्जदार क्र. २ यांना वाटपाआधारे दिला आहे व त्याबाबत महसूल फेरफार नोंद क्र. ३११० अभिलेखावर दाखल केलेला आहे. सदरील दोन्ही फेरफार नोंदी व दावा मिळकतीचा ७/१२ उता—याचे अवलोकन केले असता वादातील विहीरीत अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांचा व गैरअर्जदार क्र. १ याचा कायदेशीर हिस्सा असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते.

१५. परंतू सदरील अर्जात वादातील विहीरीच्या कायदेशीर हिश्याबाबत वाद नाही तर याठिकाणी सदरील विहीरीच्या निश्चीत अस्तीत्वाबाबत वाद आहे. त्यामूळे वादातील विहीरीचे अस्तीत्व निश्चीत

कोठे आहे हे पाहणे आवश्यक आहे. सदरील बाब स्पष्ट होण्यासाठी मुळ दावा व प्रस्तूतच्या अर्जाचे अवलोकन केले असता त्यामध्ये वादातील विहीर शेत गट क्र. ५ मध्ये गिरजा नदिच्या उत्तर काठावर असल्याचे कथन आहे. सदरील बाब सिध्द करण्यासाठी अर्जदारांनी सदरील वादातील विहीरीची चतु:सिमा अभिलेखावर आणने आवश्यक होते. परंतू वर नमूद केल्याप्रमाणे दाव्यात तसेच प्रस्तूत अर्जात सदरील चतु:सिमा नमूद नाहीत. तसेच अर्जदारांतर्फे सदरील चतु:सिमेचा कुठलाही महसूल दस्त अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे अर्जदारांच्या वाद कथनावरून वादातील विहीरीचे अस्तीत्व निश्चीत कोठे आहे हे प्रथमदर्शी स्पष्ट होत नाही.

१६. याउलट गैरअर्जदार क्र. १ यांनी सदरील विहीरीची २ आर शेतजमीन अर्जदार क्र. १ यांना विक्री केल्याबाबत सदरील खरेदीखताची प्रमाणीत प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदरील दस्ताचे अवलोकन केले असता दिनांक ११.०१.२०११ रोजी अर्जदार क्र. १ याने विहीर खोदण्याकरीता सदरील २ आर शेतजमीन विकत घेतलेली आहे. तसेच सदरील जमीनीची चतु:सिमा देखील सदरील खरेदीखतात नमूद आहे. परंतू सदरील खरेदीखताबाबत अर्जदारांनी वाद कथनात कुठेही उल्लेख नमूद केलेला नाही. त्यामूळे अर्जदारांनी सदरील महत्वाचे वाद कथन प्रस्तूत दाव्यात का नमूद केले नाही ही बाब स्पष्ट होत नाही. त्यामूळे एकंदरीत अभिलेखावरील दस्तऐवजावरून वादातील विहीरीचे स्थान स्पष्ट होत नाही. तसेच गैरअर्जदार क्र. १ च्या वाद कथनातील पुन:जिवीत केलेल्या विहीरीचा विचार केला असता त्याबाबत फेरफार नोंद क्र. ३१२२ मंजूर झालेली आहे. तसेच सदरील फेरफार नक्कल अभिलेखावर उपलब्ध आहे. तसेच सदरील फेरफार नोंद रद्द झाल्याबाबत कुठलाही प्रथमदर्शी पुरावा अभिलेखावर नाही. अशा परीस्थीतीत गैरअर्जदार क्र. १ याची सदरील पुन:जिवीत केलेली विहीर अस्तीत्वातच नाही असा निष्कर्ष काढता येणार नाही. एकंदरीत सदरील दोन्ही विहीरीचा वाद असल्यामूळे, तात्पुरता

मनाई हुकूमाचा आदेश पारीत करतांना वादातील विहीरीचे निश्चीत ठिकाण अर्जदारांनी प्रथमदर्शी अभिलेखावर आणणे आवश्यक होते. परंतू त्याबाबत वर नमूद केल्याप्रमाणे प्रथमदर्शी लेखी पुरावा अभिलेखावर नाही. अशा परीस्थीतीत अर्जदारांनी त्यांच्या कथनांच्या समर्थनार्थ निशाणी क्र. १७ च्या दस्त यादीसोबत दाखल केलेल्या साक्षीदारांचे केवळ शपथपत्र देखील विचारात घेणे योग्य होणार नाही. एकंदरीत वरील कारणमिमांसेचा विचार केला असता वादातील विहीरीचे ठिकाण निश्चीत होत नसल्यामूळे अर्जदारास प्रथमदर्शी दावा सिध्द झालेला नाही. अशा परीस्थीतीत गैरअर्जदार यांच्या विरूध्द तात्पुरता मनाई हुकूम पारीत केल्यास वादातील विहीरीतील त्याचा चार आणे हिस्सा उपभोगण्यासाठी तसेच त्यांच्या कथीत पुन:जिवीत विहीरीचा उपभोग घेण्यापासून ते वंचीत राहतील म्हणून अर्जदार यांच्या ऐवजी गैरअर्जदार यांचे जास्त नुकसान होईल असे प्रथमदर्शी दिसून येते त्यामूळे न्यायाचा समतोल देखील अर्जदारांच्या हक्कात नसल्याचे प्रथमदर्शी दिसून येते म्हणून वरील कारणमिमासेस अनुसरून मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ करीता:**

१७. मुद्दा क्र. १ ते ३ वरील निष्कर्षा अन्वये अर्जदार हे तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यास पात्र नाहीत. करीता मी खलील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात आला.

स्वाक्षरित/—
( एस. एस. बजाज )
दिनांक: ०३.१०.२०२०. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
भोकरदन. (कार्ट क्र. १)

Shital Shriram Bajaj
Digitally signed by Shital Shriram Bajaj
Date: 2020.10.06 12:29:40 +0530

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी. डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : यु. आर. दसरे
न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय क. स्तर भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी. डी. एफ. दिनांक : ०५.१०.२०२०.

स्वाक्षरित/—
लघुलेखकाची सही